अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# खरा प्रजासत्ताक अजून यायचा आहे

डोंबाऱ्याचा खेळ सगळ्यांच्याच माहितीतला आणि परिचयाचा प्रकार असतो. एकदा अशाच एका चौकामध्ये लहान मुलं आपल्या शरीरिक कसरती दाखवण्याचा खेळ करीत होते. त्यातले दोघे आपल्या कसरती दाखवत होते, तर एक जण गळ्यातील ढोलके वाजवून लोकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत होते. त्यातला एक मुलगा आणि एक मुलगी छोट्या वर्तुळाकार लोखंडी रिंगमधून आपले सगळे शरीर दुमडून वाकवून पुन्हा पुन्हा बाहेर काढत होते. असे वारंवार करता करता मात्र तो थकला आणि रडायला लागला. त्याची ती केविलवाणी परिस्थिती बघवणारी नव्हती आणि मग आजुबाजूचे लोक कुठेतरी दयाभावनेने त्या मुलांच्या कटोऱ्यात चार दोन पैसे टाकत होते. पोटातला आगडोंब शमवण्यासाठी डोंबाऱ्याचा खेळ करणारी हजारो कुटुंबे या देशामध्ये आहेत. आज भारत आपला ६५ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत असताना या परिस्थितीची जाणीव झाल्याशिवाय राहात नाही. लाखो कुटुंबे हलाखीचे जीवन जगतात, त्या देशातल्या प्रजेसाठी सुखासमाधानाचे जीवन अजूनही कित्येक कोस दूर आहे. हेही जाणवल्याशिवाय राहात नाही. भारत स्वतंत्र झाल्यानंतर लोकशाही कार्यपध्दती स्वीकारली गेली. यामध्ये 'लोकांनी लोकांसाठी लोकांमार्फत चालविलेले राज्य' असे त्याचे स्वरुप अभिप्रेत होते. प्रजासत्ताक व्यवस्था निर्माण करताना जनता हीच सार्वभौम राहील अशीच अपेक्षा होती. सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे समाजाला निर्णय प्रक्रियेमध्ये सामावून घेता यावे. समतोल विकास व्हावा, समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या त्रिसूत्रींना हे प्रजासत्ताक बांधिल राहावे असा अतिशय मूलभूत विचार त्यावेळी मांडला गेला. देशातल्या गरिबातल्या गरिबाला आणि श्रीमंताला देखील समान न्याय मिळावा हक्क आणि अधिकाराचे वाटप करताना त्यात विषमता राहू नये. कायदे सर्वांसाठी सारखेच राहतील याची काळजी घेऊन ही प्रजासत्ताकरुपी लोकशाहीची सनद १९५० साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला समर्पित केली होती. आज ६०-६५ वर्षांचा कालावधी लोटला आहे. मागे वळून पाहताना ज्या उद्देशाने प्रजासत्ताक कार्यपध्दती निर्माण झाली तो उद्देश तितकासा सफल झालेला दिसून येत नाही. प्रजा गौण ठरली आणि मूठभर राजकारणी सत्तेचा उपभोग घेऊ लागले. प्रजेच्या नावावर मजा मारण्याचा एक नवा वर्ग अस्तित्वात आला आणि गेल्या ६० वर्षांत त्यांचीच प्रगती होत राहिली. देशाच्या ७० टक्के ग्रामीण भागात जो सामान्य कष्टकरी वर्ग राहतो, त्यांच्या दररोजच्या आयुष्यामध्ये दीडदमडीचाही फरक पडला नाही. पिढ्यानुपिढ्या गरिबीचे चटके सहन करणारा, आर्थिक दुर्बलतेमुळे शिक्षण, आरोग्य यासारख्या महत्त्वाच्या सुविधांपासून तो वंचित राहिला. आजही ६४ वर्षांनंतर ज्या देशातील सरकारी आकडेवारीप्रमाणे ४० टक्के जनता आणि स्वयंसेवी संस्थांच्या अभ्यासानुसार ६० टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली राहत असेल, तिला फक्त ३२ रुपये रोज मिळत असेल तर आपण कोणत्या प्रजासत्ताकाचे समारंभ साजरे करीत आहोत असा प्रश्न निर्माण होतो.

### सामान्य प्रजेचे स्वप्न अपुरे

वंचितांचे तांडेच्या तांडे देशाच्या अनेक भागामध्ये अन्न, वस्त्र, निवाऱ्यासाठी भटकत असतात त्यांचा हा जर प्रजासत्ताक असेल तर आपलीच आपण केलेली ती घोर आत्मवंचना ठरते. इंग्रज गेल्यानंतर फार मोठ्या आनंदाने आणि अपेक्षेने स्वातंत्र्याचे स्वागत केले गेले. स्वकीयांचे सरकार स्थापन झाल्यामुळे आता या देशातील सामान्य माणूस सुखी आणि समाधानी होईल. अनेक वर्ष दडपलेल्या त्याच्या आवाजाला स्थान मिळेल असे वाटले होते. परंतु स्वकीयांचे सरकार असूनही सामान्य प्रजेला प्रसन्नतेचा अनुभव येत नाही हे नाकारून चालणार नाही. सरकारी पातळीवर प्रजासत्ताक दिनाचे कार्यक्रम साजरे होतात. दिल्लीत परदेशी पाहुण्यांना बोलावून देशाच्या विकासाचे चित्र उभे केले जाते. भारताच्या लष्करी सामर्थ्याचे दर्शन घडविले जाते प्रत्येक राज्याचा एक एक चित्ररथ प्रजासत्ताक दिनाच्या संचलनामध्ये सहभागी होतो. या चित्ररथामध्येसुध्दा अजूनही अनेक राज्यांमध्ये कसे सामान्य जनजीवन आहे, असेही चित्र सादर केलेले असते. चित्ररथ आणि समारंभाचा डौल सोडून दिला तर वस्तुस्थिती त्याच्या विपरीत असल्याचे दिसून येते साधारणपणे लोकशाहीप्रधान देशात प्रजा सार्वभौम असेल तर तिच्या अपेक्षांचा आणि गरजांचा प्राधान्याने विचार व्हायला हवा. प्रजा केवळ मतदानापुरती नाही तर तिला आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या आश्वासनांची गरज असते. मूलभूत गरजा जर पूर्ण होत नसतील तर त्या प्रजेचे अधिकार त्यांना बहाल केले गेले नाहीत असा त्याचा अर्थ निघतो. जगाच्या इतिहासामध्ये ज्या ज्या देशांनी वेगाने प्रगती केली तिथे तिथे सामान्य जनतेचाच सर्वप्रथम विचार झाला तिची सुरक्षितता अधिकाधिक स्वावलंबी व्हावी आणि देशाच्या विकासामध्ये तिने हातभार लावावा, असेच प्रयत्न झाल्याचे दिसून येते. मग तो बलाढ्य अमेरिकेसारखा देश असो किंवा, इस्त्रायलसारखे छोटेसे राष्ट्र असो एवढेच नव्हे तर महायुध्दामध्ये बेचिराख झालेला जपान असो. आज स्वावलंबी आणि तंत्रज्ञानाने परिपूर्ण राष्ट्र म्हणून ओळखले जाते. इस्त्रायल किंवा जपानचा प्रवास असाच भारतासारखा गेल्या ६०-७० वर्षांतला आहे. त्या राष्ट्रांना जर अशा प्रकारचे परिवर्तन घडवून आणता आले तर भारताला ते का शक्य झाले नाही? याचा निश्चितच विचार करावा लागेल. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या देशातील लोकशाहीचा उपयोग मूठभर राजकारण्यांनी आणि भांडवलदारांनी स्वत:साठी करून घेतला म्हणूनच आज समारंभापुरताच प्रजासत्ताक शिल्लक राहिला.

### काळा पैसा देशाबाहेर

अशी असमाधानकारक परिस्थिती असूनही लोकांमध्ये आपला देशाभिमान दिसून येतो. लोकशाही मार्गानेच सत्ताधाऱ्यांना वठणीवर आणता येईल अशी जिद्द त्यांच्यात पहायला मिळते. काही प्रमाणात अशा जिद्दीचा प्रयोग सुरू झाला आहे. सामान्य जनतेला तिच्यासारखेच सामान्य स्वरुपाचे सरकार हवे आहे. गेल्या अनेक वर्षांत निर्माण झालेले व्हीआयपी कल्चर मोडून काढले पाहिजे आणि खऱ्या अर्थाने जनतेला जबाबदार असणारे सरकार स्थापन व्हावे असा आवाज घुमू लागला आहे. गेल्या ६४ वर्षांमध्ये या देशातले २० टक्के श्रीमंत आणखी श्रीमंत झाले आणि गरिबाला गरिबीच्या खाईत लोटत राहिले हा बेबनाव बिनबोभाट चालू राहिला म्हणूनच ६० लाख कोटींचा काळा पैसा परदेशी बँकांमध्ये जमा होऊ शकला. आज हा पैसा भारतात आणण्याची एकाही राजकीय पक्षामध्ये हिम्मत नाही. तो पैसा भारतात आला तर देशातला एकही माणूस गरीब राहणार नाही. खेडयापाड्यांमधल्या पायाभूत सुविधा सहजपणे निर्माण करता येतील. मोबाईल किंवा घराघरात पोहोचलेला टिव्ही म्हणजे देशाची प्रगती असे चित्र निर्माण केले. परंतु निरक्षरता, बेकारी, कुपोषण या समस्या पाहिल्या तर अजून आपल्याला प्रगतीचे किंवा खऱ्या प्रजासत्ताकाचे मर्मच कळलेले नाही. अर्थात आशा न सोडता आत्मविश्वास कायम ठेवून हाच प्रजासत्ताक अर्थपूर्ण करावा लागेल. त्यासाठी तो चिरायू होवो, अशी शुभेच्छा द्यावी लागेल.